# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
### वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 23.08.2024** **वार– शुक्रवार**

---

**फुले स्मार्ट हवामान केंद्र**

पुण्यातील कृषी महाविद्यालयाच्या पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विभागातील देशी गाय संशोधन आणि प्रशिक्षण केंद्रांत फुले स्मार्ट हवामान केंद्राचं उद्घाटन पाटील यांच्या हस्ते झालं. हवामानावर आधारित अचूक पशुधन सल्ला व्यवस्थापन महत्त्वाचं असून ही गरज भागवण्यासाठी देशी गाय संशोधन आणि प्रशिक्षण केंद्रात फुले स्वयंचलित हवामान केंद्राची उभारणी केल्याची माहिती महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांतकुमार पाटील यांनी दिली.

**विद्यापीठ**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय विभागाच्या 6 विद्यार्थ्यांची इरास्मस मुंडस (Erasmus Mundus) या शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे. आंतरविद्याशाखीय विभागाच्यावतीने चालविल्या जाणाऱ्या विविध अभ्यासक्रमाचे विद्यार्थी जगभरातील विविध विद्यापीठात शिक्षण घेत आहे. या शिष्यवृत्तीसाठी संपूर्ण देशातून 146 विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

**अवचट**

ज्येष्ठ लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते दिवंगत डॉ. अनिल अवचट यांच्या जन्मदिवसाचं औचित्य साधत पुण्यात सोमवारी पुस्तक प्रकाशन समारंभाचं आयोजन करण्यात आलं आहे. डॉ. अनिल अवचट यांच्या 'जवळचे' या पुस्तकाचं आणि त्यांनी लिहिलेल्या 'द वंडर दॅट इज पुणे' या इंग्रजी पुस्तकाचं प्रकाशन करण्यात येणार आहे.

**रोजगार मेळावा**

तरुणांना रोजगार मिळावा यासाठी राज्य शासनाच्या वतीनं मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबवण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली 26 ऑगस्ट ला मोरवाडी इथल्या दिव्यांग भवनात रोजगार मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे.

## पुरवणी परीक्षेचा निकाल

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे यावर्षी जुलै आणि ऑगस्ट महिन्यात घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षेचा निकाल आज ऑनलाईन पद्धतीनं जाहीर करण्यात आला. यात दहावीच्या परीक्षेत 36 पूर्णांक 78 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत तर बारावीच्या परीक्षेत 32 पूर्णांक 46 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे.

## पुणे विमानतळ

पुणे विमानतळावरील नवीन टर्मिनलमध्ये आपत्कालीन वैद्यकीय कक्ष सुरू करण्यात आला आहे. या कक्षात प्रवाशांवर मोफत उपचार केले जाणार असून, हा कक्ष 24 तास खुला असणार आहे. आपत्कालीन वैद्यकीय कक्षाचं उद्घाटन काल पुणे विमातळाचे संचालक संतोष ढोके आणि ग्रँट मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष तसंच व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. परवेझ ग्रँट यांच्या हस्ते झालं. हा कक्ष नवीन टर्मिनल इमारतीतील चेक-इन भागात आहे.

## लाडकी बहीण

राज्यातील महिलांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत दिल्या गेलेल्या पैशातून जीएसटी किंवा  अन्य कोणतीही कर कपात न करण्याचे आदेश सर्व बँकांना देण्यात आले आहेत. ज्या बँकांनी यापूर्वी या पैशातून कर कपात केली आहे ती रक्कम संबंधित महिलेच्या बँक खात्यात पुन्हा जमा करावे असं  देखील आदेशात स्पष्टपणे नमूद केलं आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड सह राज्यातील अन्य बँकांकडून ही कर कपात झाल्याच्या अनेक तक्रारी दाखल झाल्या होत्या.

## मंकीपॉक्स

जगभरातील विविध देशांमध्ये मंकीपॉक्सचा प्रसार वेगानं सुरू आहे. या पार्श्वभूमीवर पुणे विमानतळावर परदेशातून येणाऱ्या प्रवाशांची तपासणी 20 ऑगस्ट च्या रात्रीपासून सुरू करण्यात आली आहे. संशयास्पद रुग्ण आढळल्यास त्यांना विलगीकरणात ठेवण्यासाठी नायडू संसर्गजन्य रुग्णालयात 10 खाटा राखीव ठेवल्या आहेत. महापालिकेचा आरोग्य विभाग विमानतळ आरोग्य अधिकाऱ्यांच्या सतत संपर्कात असल्याची माहिती महापालिका सहायक आरोग्य अधिकारी डॉ. सूर्यकांत देवकर यांनी दिली.

## नदीपात्र

पुणे शहरातून वाहणाऱ्या मुळा मुठा नदी पात्रात पुन्हा एकदा कचरा आणि राडारोडा टाकण्याचं प्रमाण वाढल्याचं निदर्शनास आलं आहे, मात्र महापालिका प्रशासनाकडून त्याकडं सोयीस्कर दुर्लक्ष

केलं जात असल्याचा आरोप होऊ लागला आहे. गेल्या महिन्याभरात मुसळधार पावसामुळं दोन वेळा शहरात महापुराची परिस्थिती निर्माण झाली होती आणि केवळ नदी पात्रातील राडा रोडाच त्याला थेट जबाबदार ठरला होता. आगामी काही दिवसांत पुन्हा धरणांतून मोठ्या प्रमाणावर विसर्ग करण्याची वेळ आली तर कचऱ्याचे हे ढीग नव्यानं महापुराला आमंत्रण देणारे ठरू शकतील हे महापालिका प्रशासनानं लक्षात घेऊन वेळीच त्यावर कार्यवाही करावी अशी मागणी पुण्यातल्या विविध संस्थांकडून होत आहे.

**भाजपा महिला मोर्चा**

पुणे शहर तसंच राज्यातील इतर भागात अल्पवयीन विद्यार्थिनींवर लैंगिक अत्याचार आणि विनयभंगाच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर भाजपा पुणे शहर महिला मोर्चाच्या शिष्टमंडळानं पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. त्यावेळी त्यांना आपल्या मागण्यांचं निवेदन देखील सादर केलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**